
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# साहित्यनिर्मितीप्रक्रिया - एक चितंन

प्रा.डॉ. संजय कुलकर्णी
प्रमुख - मराठी विभाग , जवाहर महाविद्यालय, अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

प्रस्तावना :

मराठी साहित्यनिर्मितीचा आणि साहित्यसमीक्षेचा विचार करता असे दिसून येते की, एखादे कथानक रंगवूण सांगणे म्हणजे कथा-कादंबरी किंवा आपल्याला सहज वाचता वाचता वैयक्तिक कारणावरुन आवडले नाही, ती आवड-नावड व्यक्त करणे म्हणजे साहित्यसमीक्षा असा समज असल्याचे दिसते. साहित्यनिर्मितीविषयक विविध प्रश्नांची चर्चा करणे, समस्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करणे, निर्मितीची विविध अंगे समजून घेऊन, प्रत्यक्ष निर्मितीच्या वेळी अनेक लेखनावस्थांचा परस्पर परिणाम तपासणे, निर्मितीच्या बाजूने पात्रे, कथानके, प्रंसग यांची आवश्यकता व अनावश्यकता तपासणे अशी कितीतरी विचारांची अंगे निर्मितीप्रक्रियेशी निगडीत असतात. त्या विषयीचे लेखन होणे हे साहित्यनिर्मिती आणि साहित्यसमीक्षा या दोहोनांही महत्त्वाचे ठरणारे आहे. निर्मितीप्रक्रियेचा विचार जाणकार लेखकांनी, जाणीवपूर्वक लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी करणे महत्त्वाचे आहे.



कथा, कादंबरी, नाटके इत्यादी साहित्यप्रकाराचे लेखन कसे करावे, याविषयीचा विचार मराठीमध्ये प्रथम ना.सी. फडके यांनी रूजविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तशाप्रकारचे लेखन अनेकांनी केले. पण हे सर्व लेखन अतिशय प्राथमिक पातळीवरचे, तंत्रावर अधिक भर देऊन केलेले दिसते. निर्मितीप्रक्रियेतील मूळस्त्रोताला, चैतन्यपूर्ण विविधतेला, प्रत्येक कलाकृती निर्माण करताना होणाऱ्या जटिलतेच्या स्वरुपाचा विचार केला गेला नाही. बा.सी. मर्ढेकरांनी आपल्या 'सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथात साहित्यनिर्मिती नीटस स्वरुपात होण्यासाठी कोणती प्राथमिक पण महत्त्वाची पथ्ये पाळावी लागतात हे सांगितले आहे. पु.शि. रेगे, दिलीप चित्रे, गंगाधर गाडगीळ, विंदा करंदीकर या व इतर कलानिर्मिती करणाऱ्या व चांगली समीक्षादृष्टी असलेल्या सर्जनशील लेखकांनी निर्मितीप्रक्रियेच्या विचारांचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. पण तसे करताना दिसून येत नाही. सर्जनशील लेखकाने निर्मितीप्रक्रियेविषयी लिहिणे म्हणजे स्वतःच्या निर्मितीविषयक अनुभवांचा तटस्थपणे शोध घेणे, त्याविषयी काही तटस्थ निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. निर्मितीप्रक्रियेविषयी काही विचार मांडताना अपरिहार्यपणे स्वतःचीच उदाहरणे घ्यावी लागतात. त्याप्रमाणे ती घ्यावीत. येथे आत्मगौरवाचा मुद्दा उपस्थित केला जाऊ नये. कळतनळत बोलण्यातून, व्याख्यानातून लेखकांची 'आत्मनिष्ठा' व्यक्त होतच असते. ही आत्मनिष्ठा काही उपयुक्त लेखनासाठी योग्य त्या ठिकाणी राबविण्यात काही हरकत नसावी. निर्मितीप्रक्रियेचा विचारच मुळी लेखकाला आलेल्या निर्मितीविषयक अनुभवांवरच अधिष्ठित असतो. अशा वेळी तो पूर्ण मोकळेपणाने मांडणे, हेच वाङ्मयीन नीतीला धरुन होणारे आहे. विज्ञान युगातील मराठी लेखकाने हे ओळखून आधुनिकतेला सामोरे जायचे असेल तर निकामी शिष्टाचार सोडून वस्तुनिष्ठतेने आणि बुद्धिनिष्ठेने विचार मांडले पाहिजेत. आधुनिक लेखकांनी वैज्ञानिक दृष्टिकोण स्वीकारला पाहिजे. आपल्या साहित्यनिर्मितीकडे विज्ञाननिष्ठेने पाहिले पाहिजे. तरच निर्मितीप्रक्रियेच्या विचारांमध्ये वस्तुनिष्ठा आणता येणे शक्य आहे. साहित्यिक काटेकोरपणे निर्मितीप्रक्रियेचा विचार मांडू लागला, त्याचा शोध घेऊ लागला, तर त्याची स्वतःची कलानिर्मिती अधिक सुजाण आणि समृद्ध होण्याची शक्यता आहेच पण तो इतर साहित्यिकांनाही निर्मितीच्या दृष्टीने उपकारक ठरणारा आहे.

महाराष्ट्रामध्ये सर्व विद्यापीठात 'मराठी साहित्य' पदवी परिक्षेसाठी घेता येते. बी.ए., एम्.ए. ला 'मराठी' विषय घेणारे अनेक विद्यार्थी असतात. यातील पुष्कळ विद्यार्थी कथा, कविता, नाटक,



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

कादंबरी लिहू इच्छिणारे असतात किंवा तशी महत्त्वाकांक्षा बाळगणारे असतात. बी.ए., एम्.ए. ला मराठी विषय घेतला तर आपल्या साहित्यनिर्मितीला तो उपयुक्त ठरेल, असे त्यांना वाटते. 'मराठी साहित्य' घेणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण ७०-७५ टक्के आहे. याचा विचार करुन निर्मितीप्रक्रियेचा विचार मराठीमध्ये झाला तर साहित्यनिर्मितीचे उगवणारे हे अंकुर वाढीस लागतील. हा विचार अभ्यासकक्षेच्या बाहेर राहून छंद म्हणून, एक ध्यास म्हणून जोपासला जाईल. विद्यार्थ्यांमध्ये निर्मितीविषयक आत्मविश्वास निर्माण करण्यास कारणीभूत होईल.

समीक्षाव्यवहाराला निर्मितीप्रक्रियेविषयीचा विचार अनेक दृष्टींनी मार्गदर्शक व उपकारक ठरणार आहे. एखाद्या कलाकृतीची निर्मितीप्रक्रिया समजली किंवा एकुणच निर्मितीप्रक्रियेचा व्यवहार कसा चालतो हे कळते. काही साहित्यिक अनुभवाशी एकरूप होऊन त्याच पातळीवरुन अनुभव व्यक्त करतात. कवी प्रवृत्तीच्या साहित्यिकांचे एक जीवनविषयक तत्वज्ञान बनून जाते आणि त्यांना येणारा प्रत्येक अनुभव त्यांच्या तत्वज्ञानाच्या भिंगातूनच आकार घेत साहित्यकृतीत येऊ लागतो. काही लेखक एकाच ठायी उभे न राहता वेळोवेळी टप्पे बदलूनही लेखन करणारे असतात. उदा. व्यंकटेश माडगूळकर हे वस्तुनिष्ठपणे एकाच बिंदूवर स्थिर राहून अनुभव व्यक्त करणाऱ्या लेखकांपैकी एक असल्याचे दिसते. तर जी.ए. कुलकर्णी दुसऱ्या टोकाच्या आत्मनिष्ठ लेखकांपैकी एक मानता येतील. एखादा साहित्यिक आपल्या प्रकृतिधर्मानुसार साहित्य निर्माण करीत असतो. तशाप्रकारे साहित्यच त्याला कळत न कळत नमुनेदार साहित्य वाटत असते. मग तो दुसऱ्याचे तशाच प्रकारचे साहित्यही आवडीने वाचत असतो. ग्रामीण कथेच्या बाबतीत, आवश्यक वाटेल तिथे संपूर्ण ग्रामीण भाषा वापरून ग्रामीण जीवनाचे वास्तव जीवनदर्शन घडविण्यासाठी आनंद यादव यांनी ग्रामीण भाषा स्वीकारली आहे. थोडक्यात, निर्मितीप्रक्रियेचा विचार साहित्यात नीटपणे आणि पुरेशा गंभीरपणे व वस्तुनिष्ठपणे सुरु झाला तर समीक्षाला वेगळी दिशा मिळू शकते.

एखाद्या लेखकाची प्रतिभाशक्ती काही विशेष गुणांनी सजलेली असते. उदा. विजय तेंडुलकरांची साहित्यनिर्मिती करणारी प्रतिभाशक्ती नाट्यात्मतेच्या विशेष गुणांनी सजलेली असते. तिला अनुभवातील नाट्यच महत्त्वाचे वाटत असावे. अनुभव त्याच अंगानी घेण्याची तिची वृत्ती असावी. नाटककाराची वाङ्मयीन वृत्ती प्रगट करताना वसंत कानेटकर म्हणतात, 'मला वाङ्मयीन अनुभव निर्मितीच्या अंगाने घेताना नाटकच दिसू लागते'. त्यांच्या म्हणण्याचा हेतू असा की, 'नाटक या साहित्यप्रकाराद्वारेच मी निर्मितीशील अनुभव घेतो.' एकेकाळी वसंत कानेटकर यांनी कथा, कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. पण त्यापेक्षा त्यांना नाटक या साहित्यप्रकारात विशेष यश मिळाले. काही लेखक नुसत्या कथाच लिहितात किंवा नुसत्या कविताच लिहितात. अशा लेखकांची वृत्ती त्या त्या साहित्यप्रकाराच्या द्वाराच कोणताही कलानुभव घेण्याची असावी. उदा. अरविंद गोखले, जी.ए. कुलकर्णी, विंदा करंदीकर इत्यादी तर काही साहित्यिक परंपरेच्या शिस्तीला, प्रवाहाला मानणारी असतात. त्या परंपरेत निर्माण झालेल्या पूर्वसूरीच्या श्रेष्ठ साहित्यिकांना किंवा आवडत्या साहित्यकृतींना प्रमाण मानून आपली घडण करणारी असतात. अनेक लेखक, मी आमक्या साहित्यिकांना विशेष मानतो, आमक्याचा परिणाम माझ्या साहित्यावर आहे. अमुक लेखक मला गुरु स्थानी आहेत, अशा प्रकारचे उद्‌गार काढतात म्हणजेच ते इतर बाबीबरोबरच त्यांच्या प्राकारिक परंपरांनाही कळत न कळत मानत असतात. काही लेखक प्राकारिक कक्षेत राहूनच साहित्यनिर्मितीचे प्रयोग करणारेही आहेत. उदा. कवी केशवसुत यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात नवनवे रचनाबंध बाहेरून आणण्याचा प्रयत्न केला. कवी अनिलांनी मुक्तछंद निर्माण केला. कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळांनी प्रयोग करून नवकथा लिहिली.

प्रयोगशीलता ही काहीशा आग्रही वृत्तीमुळे निर्माण होऊ शकते. पण त्या प्रयोगशीलतेमुळे आर्वत फुटण्यास, साहित्य प्रकार अधिक समावेशक होण्यास साहाय्य होते ही बाब अधिक महत्त्वाची आहे. अशा या जाणिवतेच्या अतिरिक्त प्रकर्षातून वाङ्मयीन ईर्षा निर्माण होते. उदा. गंगाधर गाडगीळ यांनी वाङ्मयीन ईर्षा बाळगून नवी कथा लिहिली. तिची संकल्पना स्पष्ट केली. त्याच प्रकारचे विपुल लेखन करुन ती प्रस्थापित केली. विंदा करंदीकरांनी ही अशाप्रकारे पुर्वसुरीपेक्षा वेगळा लघुनिबंध लिहिला. नवकवितेच्या क्षेत्रात मुक्त सुनीत, तालचित्रे, विरूपिका अशी शीर्षके देऊन नेव छोटे-मोठे प्रयोग केले. गंगाधर गाडगीळ आणि विजय तेंडुलकर यांच्या लेखनामुळे नवकथा, नवनाटक प्रस्थापित झाले.

साहित्यनिर्मिती आणि साहित्यप्रकार -

यांच्या परस्परसंबंधाचा विचार करता, त्याच्या बुडाशी अनुभवातील आत्मनिष्ठा, वस्तुनिष्ठा आणि भाषामाध्यम ही तीन सुत्रे साहित्यप्रकारांवर नियंत्रण ठेवू शकतात, असे दिसते. मराठी साहित्यात, कविता, ललित गद्य, कथा, कादंबरी, नाटक हे प्रमुख साहित्यप्रकार मानले गेले आहेत. कथा आणि कादंबरी याचे दृढ संबंध आहेत. या दोन्ही प्रकारात प्रमाणाचा फरक पडतो. प्रमाणातील फरकामुळे गुणवत्तेतही फरक पडतो. त्यातूनच कथेपेक्षा भिन्न वाटणारी काही वैशिष्ट्ये कादंबरीत निर्माण होतात. कादंबरीच्या तुलनेने कथेची बंदिश छोटी असते. त्यामुळे तिच्यात कालपट मोठा घेता येत नाही. पात्राची गर्दी करता येत नाही, प्रसंग फार घेता येत नाहीत. कादंबरीची बंदीश ही कथेच्या तुलनेने मोठी असते. त्यामुळे मोठा कालपट, मोठा जीवनपट घेता येतो. त्यांना न्याय देता येतो. त्याचा विकास दाखविणे शक्य होते. नाटक हा अनेक व्यक्तींच्या जीवननाट्याला सामोरे जाऊन घेतलेला अनुभव असतो. भाषेचे संवादत्वच तिथे फक्त वारलेले असते. तिथे फक्त पात्रे बोलू शकतात. कादंबरीत निवेदनाच्या रूपाने कादंबरीकार अवतरू शकतो. नाटकात ही सोय नसते. त्यामुळे वस्तुनिष्ठ अनुभवाचे निखळ रूप तिथे जाणवू लागते. शिवाय नाटक दृश्यात्मक पातळीवर, देखाव्याच्या रूपाने अवतरत असते. त्यामुळे नाटक इतर कोणत्याही साहित्यप्रकारापेक्षा



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

वेगळेपणाने उठून दिसते. त्याप्रमाणे सगळेच लेखक सर्व वाङ्मयप्रकार हाताळतात असे म्हणता येत नाही. कुणी जन्मभर एकच साहित्यप्रकार हाताळत असतो. तर कुणी 'नाटक' हा प्रकार हाताळतो तर कुणी 'कविता' हा साहित्यप्रकार हाताळताना दिसतो. कारण तो लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी, जवळीकतेशी निघडीत असतो. अशा पद्धतीने पुष्कळ कारणांनी व पुष्कळ प्रकारांनी साहित्यप्रकारांना शरण जाऊन साहित्यनिर्मिती होत असते.

संदर्भ -

१. आनंद यादव, 'साहित्याची निर्मितीप्रक्रिया'
२. बा.सी. मर्ढेकर, 'सौंदर्य आणि साहित्य'
३. ना.सी. फडके, 'प्रतिभा साधन'
४. ना.सी फडके, 'लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र'
५. प्रदक्षिणा खंड - १ व २, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.